लग्न म्हणजे बस्ता
बस्ता म्हणजे राजेन्द्र
१९५९ पासून राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425 - 225740, मोबा : 7901031155

संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची
# नायक
सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

हरिचंद टेक्सटाईल्स मार्केट
एथनिक वेअर | बस्त्यासाठी खास सोय
नामांकित कंपन्यांचे सुटींग शर्टींग | होलसेल साडी डेपो
आम्ही जपतो तुमचा विश्वास..!
मार्केट यार्ड जवळ, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर ,7972842036

Sangamner | MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024 | वर्ष ८ | अंक ५ | १/५/२०२५ (दैनिक) | किंमत रु.२/- | पाने ४

फक्त फायदाच फायदा!
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
राजपाल मध्ये प्रत्येक
खरेदीवर पॉइंट मिळवा
आणि पॉइंट्स वर गिफ्ट मिळवा
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

कोथमिरे MASALE SINCE 1992
चवीला खरे कोथमिरे!
स्वाद, स्वास्थ्य, सर्वांगसुंदर मसाले सारे,
चवीला खरे कोथमिरे मसाले !
सन १९९२ पासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले मसाले
कोथमिरे मसाले
+91 9370584332
www.kothmiremasale.com



महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**सूचना**

गुरुवारी महाराष्ट्र दिनानिमीत्त दैनिक नायक कार्यालयास सुट्टी असल्याने गुरुवारचा अंक प्रकाशित होणार नाही. शुक्रवारी नियमितपणे अंक प्रसिध्द होईल. याची वाचक, वितरक, जाहिरातदार व प्रतिनिधींनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

# शिवसेना कार्यालयाच्या शुभारंभातून ‘उबाठा’ला खिंडार?

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची उपस्थिती

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

गेल्याकाही दिवसांपासून नाशिक पदवीधर मतदारसंघाचे ‘अपक्ष’ आमदार सत्यजीत तांबे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांनी संगमनेरचे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. त्यातून भाजप व संघामधील निष्ठावान संभ्रमित अवस्थेत असतानाच आमदार अमोल खताळ यांनी शिवसेना विस्ताराचे काम हाती घेतले आहे. मंगळवारी काही गावांच्या पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेश झाल्यानंतर आता त्यांनी शहरातील ‘उबाठा’ गटाच्या नाराजांना गोंजारण्यास सुरुवात केली असून त्यासाठी शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या शुभारंभाचा मुहूर्त निश्चित केला आहे. या कार्यक्रमाला खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार असून त्यावेळी ‘उबाठा’ गटाला खिंडार पाडून अनेकांचे पक्षांतर होणार असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. यासर्व घडामोडींचा परिणाम आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर होणार असून आमदार तांबे यांचा पक्षप्रवेश भाजपमधील नाराजीही शिगेला पोहोचवणारा ठरणार हे निश्चित आहे.



## शहरासह तालुक्यातील अनेकांचा पक्षप्रवेश

- कडव्या हिंदुत्त्ववादी विचारांना प्रभावित झालेल्यांनी पाच दशकांपूर्वी तालुक्यात शिवसेनेची पाळेमुळे रुजवली. मात्र सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर संघटनेत विस्कळीतपणा वाढण्यासह जुना-नवा असा वाद निर्माण होवून तो विकोपाला गेला, त्यातून दुखावलेले मूळचे शिवसैनिक अडगळीत जावून त्यांच्या जागा मुखवटे धारण केलेल्यांकडे गेल्याने संगमनेर तालुक्यातील उबाठाचे अस्तित्व टांगणीला लागल्याचे चित्र होते. अशा नाराजांवर लक्ष केंद्रीत करुन आमदार अमोल खताळ यांनी त्यांना गोंजारण्यास सुरुवात केल्याने आगामी कालावधीत उबाठागटाला अस्तित्वासाठी झगडावे लागण्याची शक्यता आहे.

स्थानिक पातळीवर भारतीय जनता पक्षापेक्षा अधिक बलवान असलेल्या शिवसेनेत गेल्या दशकभरापासून मोठी बेदिली माजली आहे. राजकीय महत्त्वकांक्षेतून पक्षाचा ताबा घेणाऱ्या काही (पान ३ वर)

## महत्त्वाचे

### मुला पाठोपाठ आईचीही आत्महत्या

बीड : अभिमान खेत्रे या ३६ वर्षीय तरुणाने सोमवारी दुपारी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याच्या आत्महत्येचे कारण अस्पष्ट आहे. मात्र मुलाने आत्महत्या केल्याचे वृत्त कळताच अभिमानच्या आई कौशल्या भागुजी खेत्रे (वय ७०) यांना मोठा धक्का बसला. कौशल्या यांनी देखील मुलाच्या आत्महत्येच्या काही तासांतच टोकाचे पाऊल उचलले. त्यांनी विष पिऊन आत्महत्या केली.

# आश्वी, घारगाव, लोणी परिसरात गुन्हे शाखेचे छापे!

## पंधरा जणांविरुद्ध गुन्हे दाखल



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जिल्ह्यात अवैध धंद्याविरोधात कारवाईचा सपाटा लावला आहे. या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेने आश्वी, घारगाव, लोणी तसेच राहाता परिसरातील अवैध धंद्यावर छापे टाकून १५ जणांविरुद्ध विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत ७८ हजार ३९० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस (पान ३ वर)

# भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत खांडगाव ग्रामपंचायत जिल्ह्यात अव्वल




**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या तालुक्यातील खांडगाव ग्रामपंचायतीला अटल भूजल योजनेअंतर्गत भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळाला आहे.

खांडगाव ग्रामपंचायतीने यापूर्वी माझी वसुंधरा या उपक्रमात राज्यस्तरीय क्रमांकाचे ५० लाखाचे बक्षीस प्राप्त केले होते. या पाठोपाठ अटल भूजल योजनेअंतर्गत भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत अहिल्यानगर (पान ३ वर)

JOB VACANCY
जागा त्वरित भरणे आहे
अकाऊंटंट
(एम.कॉम/बी.कॉम) टॅली आवश्यक
जीएसटी/बॅलन्स शीट/बँकिंग चा अनुभव आवश्यक
पगार - 25000/-
सिव्हील इंजिनियर
(बी.ई.सिव्हील/डिप्लोमा सिव्हील)
अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य
पगार 20,000
मार्केटिंग साठी मुले व मुली
(एम.बी.ए./ग्रॅज्युएट)
पर्सनॅलिटी व मार्केटींगचा अनुभव आवश्यक
पगार 20,000/-
इलेक्ट्रिकल इंजिनियर
(बी.ई. इलेक्ट्रिकल)
आय.टी.आय. इलेक्ट्रिकल कोर्सेस
अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य
पगार 20,000
साईट सुपरवाईजर
स्वतःची टु-व्हिलर आवश्यक
- संपर्क -
मो. 9552499399
Teacher for School
Urgent Required
1) MA (BEd) English
2) Msc (Physics)
3) Msc (Math)

NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
natureagroresort@gmail.com / www.natureagroresort.com 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD

JOB VACANCY
जागा त्वरित भरणे आहे
कॉम्प्युटर ऑपरेटर (2 जागा) शिक्षण - पदवीधर
कॅशिअर (2 जागा) शिक्षण - पदवीधर
सेल्समन/सेल्सगर्ल (4 जागा) शिक्षण-पदवीधर
हेल्पर (2 जागा) 10 वी पास
ड्रायव्हर (1 जागा) ऑटोमॅटिक गाडी चालविता येणे आवश्यक
सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्स
मेनरोड, संगमनेर, जि.अ.नगर | shahane jewellers | 02425-225642
9118 42 9118/ 98 90 499 699 | smsjewellers_sangamner

आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
OM MAYUR JEWELLERS
ओम मयूर ज्वेलर्स®
आमचे ध्येय
सर्व मानवी सुखद जीवनात सुवर्ण आनंद आणि उत्सव प्रदान करणे.
सर्व मानवाच्या संपत्तीत सोने व चांदीच्या स्वरुपात वाढ करणे.
अधिक माहिती साठी संपर्क
अशोक चौक, संगमनेर, जि. अ.नगर 422 605 फोन : 02425 225924 | मो.: 93720 12044

CHAITANYA HOSPITAL SANGAMNER
चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ.नागरे हॉस्पिटल समोर नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (02425)-221632 / 224761 / 7038170382
सर्व इन्शुरन्स कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध
(फक्त कॅशलेससाठी संपर्क नंबर - 7038170332)
डॉ.नागेश अघोर
किडनी विकार आणि प्रत्यारोपण तज्ञ
अनुभव
मागील १४ वर्षांमध्ये दोन लाखांपेक्षा अधिक डायलिसीस
उत्तर महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक किडनी प्रत्यारोपण
(kidney Transplant) या विभागामध्ये सर्वप्रथम
आंतरराष्ट्रीय रुग्णांचे किडनी प्रत्यारोपण
विरुद्ध रक्तगटाच्या अवयव दात्याकडून किडनी प्रत्यारोपण
यशस्वीरित्या सर्वाधिक रुग्णांमध्ये पार पाडण्याचा विक्रम
किडनी आजारावरील लक्षणे
चेहऱ्यावर आणि पायांवर सूज येणे | लघवी करताना आग होणे/दुखणे
भूक मंदावणे | लघवी लाल रंगाची होणे
श्वास घेण्यास त्रास होणे | मुतखडा (कीडनी स्टोन)
लघवीचे प्रमाण कमी होणे
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथ्या बुधवारी

भंडारी
क्लॉथ सेंटर ❋ सिल्क ॲण्ड सारीज
• शेरवाणी • कुर्तापायजमा • ब्लेजरसुट • इंडोवेस्टन • पॅन्ट-शर्ट
• पैठणी • घागरा • शालू • कांजीवरम
• प्युअरसिल्क • डिजायनर सारीज् • वनपीस • क्रॉप टॉप
सण समारंभात शोभा वाढवणारी वस्त्रसंपदा !
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था
शहरातले पहिले संपूर्ण ए.सी. शोरुम
मेनरोड कॉर्नर, 02425 225719
बाजारपेठ, संगमनेर

# संपादकीय

सुविचार : भीतीचा अंत तेव्हाच होऊ शकतो, जेव्हा भीती वाटणारी गोष्ट पुन्हा पुन्हा केली जाईल. – राल्फ वाल्डो इमर्सन

## कलमाडी निर्दोष

यूपीए सरकारच्या काळात गाजलेल्या अनेक घोटाळ्यांपैकी एक घोटाळा होता राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा. त्या वेळच्या बातम्या ज्यांनी ऐकल्या असतील किंवा वाचल्या असतील त्यांच्या अजूनही स्मरणात असेल, की राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनात अब्जावधी रुपयांची लूट केली गेली आणि त्याचे मुख्य सूत्रधार सुरेश कलमाडी हे होते, असा सर्रास आरोप केला जात होता. त्यातून कलमाडी यांचे राजकीय करिअर बरबाद झाले. पण ते आता या सगळ्या आरोपातून तावूनसुलाखून बाहेर पडले आहेत. त्यांच्यावरील आरोपांची जी चौकशी सीबीआय किंवा ईडीकडून सुरू होती त्यातून त्यांना क्लीन चिट मिळाली आहे. या दोन्ही महत्त्वाच्या तपास यंत्रणांना या घोटाळ्यातील आरोपाविषयी कोणताही ठोस पुरावा आढळला नाही. त्यामुळे शेवटी ईडीने क्लोजर रिपोर्ट सादर केला आणि कोर्टानेही तो स्वीकारला. त्यामुळे सुरेश कलमाडी यांच्यावरचे गेली अनेक वर्षे लागलेले बालंट पुसले गेले आहे. हा पुण्याच्या राजकारणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा विषय आहे. सुरेश कलमाडी हे पुण्याच्या राजकारणातील एक प्रभावशाली व्यक्तिमत्त्व आहे. कुठल्याही कार्यक्रमाचे झंजावाती आयोजन हे त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य असते. पुण्यात त्यांनी अनेक उपक्रम राबवून पुण्याच्या विकासाला मोठी चालना दिली होती याविषयी कोणाच्या मनात दुमत असण्याचे कारण नाही. मग तो मॅरेथॉनचा विषय असो किंवा पुणे फेस्टिव्हलचा विषय असो, कलमाडी यांनी त्यातून स्वत:विषयीचे एक मोठे ग्लॅमर किंवा वलय निर्माण केले होते. पुण्यात राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा आयोजित करून एक मोठा आंतरराष्ट्रीय इव्हेंट त्यांनी सादर केला आणि त्या पार्श्वभूमीवर पुण्यात रस्त्याच्या विकासाची मोठी कामे झाली होती ही वस्तुस्थितीही नाकारता येत नाही. आपल्या धडाकेबाज कार्यशैलीतून लोकप्रिय झालेले हे नेतृत्व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील घोटाळ्याच्या आरोपामुळे झाकोळले गेले. अनेक वर्षे हे प्रकरण चौकशीच्या आणि कोर्टकचेरीच्या फेऱ्यात अडकले. त्यातून काँग्रेस पक्षानेही त्यांना पक्षातून निलंबित केले. या सगळ्या पार्श्वभूमीवर सुरेश कलमाडी राजकारणापासून कायमचे अलिप्त झाले. आज आयुष्याच्या उत्तरार्धात ते डोक्यावर भ्रष्टाचार प्रकरणाचे बालंट घेऊन उभे होते, पण आज मात्र ते या सगळ्या आरोपातून सहीसलामत बाहेर पडले आहेत. दिल्लीत सन २०१० यावर्षी आयोजित केलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आयोजनावर त्यावेळी इतक्या विचित्र बातम्या येत होत्या, की त्या ऐकून अनेक देश आपला क्रीडा संघ या स्पर्धेसाठी दिल्लीत पाठवायचा की नाही या बुचकळ्यात पडले होते. पण बऱ्याच मिन्नतीवारीनंतर हे संघ जेव्हा दिल्लीत आले आणि त्यांनी दिल्लीतील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धाच्या आयोजनाची तयारी पाहिली त्यावेळी मात्र ते हरखून गेलेले दिसले. मुख्य म्हणजे अनेक देशांच्या क्रीडा पदाधिकाऱ्यांनी ही बाब जाहीरपणे बोलून दाखवली होती. इतक्या उत्तम आयोजनाबद्दल ज्या कलमाडींचे कौतुक होणे अपेक्षित होते, ते सुरेश कलमाडी मात्र चौकशीच्या फेऱ्यात अडकले. त्यांच्या पक्षानेही त्यांची पाठराखण केली नाही. देशातल्या ज्या क्रीडा संघटनांचे नेतृत्व कलमाडी यांनी केले त्यांनीही कलमाडी यांच्याकडे पाठ फिरवली. त्यामुळे हा एक उत्तम क्रीडा संघटक या सगळ्या प्रक्रियेतून बाजूला पडला. कधी कधी खूप कर्तबगारीसुद्धा किती अंगलट येऊ शकते याचे हे एक उत्तम उदाहरण होते. कलमाडी त्यावेळी इतके एकाकी पडले होते की जवळपास एकही माणूस त्यांच्या समर्थनार्थ पुढे आला नाही किंवा उत्कृष्ट आयोजनाबद्दल कोणी त्यांच्याबद्दल कौतुकाचे चार शब्द काढले नाहीत. हे सगळे दु:ख सोसल्यानंतर आज कलमाडी उजळ माथ्याने सगळ्यांच्या पुढे आले आहेत. विरोधी पक्षाने विशेषतः भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी तत्कालीन यूपीए सरकारवर भ्रष्टाचाराचे जे जे आरोप केले त्यातील बहुतांश आरोपांचा एव्हाना निकाल लागला आहे. टू जी स्पेक्ट्रम घोटाळ्यात यूपीए सरकारवर अफाट आरोप झाल्यानंतर त्याविषयी कोर्टाचा थेट निकालच आला असून, त्यात हा घोटाळाच अस्तित्वात नव्हता असा निर्णय कोर्टाने दिला आहे. रॉबर्ट वढेरा यांनी हरियाणात महाप्रचंड जमीन घोटाळा केल्याचा आरोप झाला होता, पण वढेरा यांच्या जमीन व्यवहारात कोणताही घोटाळा झाला नसल्याचे प्रतिज्ञापत्र हरियाणातल्या भाजप सरकारने न्यायालयात दिले आहे. ऑगस्टा वेस्टलँड हेलिकॉप्टर घोटाळ्यात थेट सोनिया गांधी यांच्यावर आरोप केले गेले; पण या प्रकरणात भलत्याच लोकांवर चार्जशीट दाखल झाले असून त्यात एकही काँग्रेस नेता नाही. सांगायचा मुद्दा एवढाच की राजकारण करत असताना समोरच्यावर आपण जे बेफाम आरोप करतो त्यातले नेमके तथ्य प्रत्येकाने तपासून पाहायला हवे. केवळ राजकारणातील बेफाम आरोपांच्या प्रवृत्तीतून सुरेश कलमाडी यांच्यासारखे देशातले एक चांगले संघटक नेतृत्व बदनाम झाले आणि परिणामी ते नामोहरम झाले. कलमाडी यांच्यावरील आरोप निराधार ठरल्याचा आनंद त्यांच्या शेकडो समर्थकांना समाधान देणारा आहे एवढे मात्र निश्चित.



## संस्मरणीय लाडोबा महोत्सव!

२६ एप्रिल ते २७ एप्रिल या कालावधीत अखिल भारतीय मराठी बालकुमार संस्था, संगमनेर आणि 'लाडोबा प्रकाशन', पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या लाडोबा महोत्सवाचा एक भाग होता आले, ही फार मोठी उपलब्धी आहे. आयोजक, प्रायोजक, संयोजक यांची साहित्यावर निष्ठा, प्रेम आणि भक्ती असल्यामुळे खास बालक–पालक आणि शिक्षक यांच्यासाठी असलेला महोत्सव किंवा कार्यशाळा कमालीची यशस्वी झाली हे निश्चित! विद्यार्थ्यांची उपस्थिती नि प्रतिसाद, शिक्षकांची तळमळ आणि साहित्यिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असलेले साहित्यप्रेमी तांबे कुटुंबीय, माजी आमदार श्री सुधीर तांबे, संगमनेर येथील नगराध्यक्षा तथा अध्यक्ष अ.भा.म.बालकुमार संस्था संगमनेर तसेच साहित्य चळवळीशी स्वयंस्फूर्तीने जोडले गेलेले कार्यकर्ते, आपल्या लेखणीच्या आणि शैक्षणिक चळवळीच्या माध्यमातून राज्यभर ख्यातकीर्त असलेले प्रा. संदीप वाकचौरे यांचा संमेलनाच्या यशात प्रशंसनीय, महत्त्वपूर्ण वाटा होता. तसेच श्री. संजय मालपाणी उद्योजक यांचा आयोजनातील सहभाग महत्त्वाचा जाणवत होता.

२६ एप्रिल रोजी घनश्याम पाटील यांच्या नियोजनानुसार सकाळी बरोबर साडेपाचच्या सुमारास आमचे सहा जणांचे दोन 'साहित्य रथ' पुणे येथून संगमनेरकडे मार्गस्थ झाले. चपराक परिवाराचे ज्येष्ठ सदस्य मित्रवर्य रवींद्र कामठे हे स्वतः वैयक्तिक कारणांमुळे येऊ शकले नाहीत परंतु त्यांनी त्यांचा 'रथ' पाठवून दिला. आमच्या साहित्यरथाचे सारथ्य करत होते, चपराक आणि लाडोबाचे प्रकाशक, घनश्याम पाटील! दुसऱ्या साहित्यरथाचे साहित्य सारथ्य करीत होते उद्योजक आणि मित्रवर्य प्रमोद येवले! आहे की नाही सुवर्णयोग! अत्यंत शांत, संयमी,अभ्यासू अशा या व्यक्तिंच्या सहवासात आमचा प्रवास सुरु झाला. सौ. शकुंतला काळे, नागेश शेवाळकर (हे दोन म्हातारे नव्हे तर महातारे), रसिका तुळजापूरकर आणि अक्षय उपळेकर हे दोन तरुण आणि या महोत्सवातच नव्हे तर संपूर्ण प्रवासात चैतन्याचा झरा निर्माण करणारे असे जोडपे... अर्थातच घनश्याम पाटील आणि त्यांच्या सुविद्य, उच्चशिक्षित, चित्रपट गीतकार पत्नी सौ. ज्योती! आमच्यासोबत हसतमुख असलेले दुसरे व्यक्तिमत्त्व म्हणजे दयानंद महापुरे. कुणी काही काम सांगण्यापूर्वी त्यांची मदत करणारा असा 'दया'वान!

आमच्या हसतखेळत, चर्चांच्या फेरी झडत असताना घनश्याम यांचे विद्वत्तापूर्ण संभाषण ऐकताना आळेफाटा आला. तिथे सौ. काळेताईंच्या दिराचे 'गुरुदेव' नावाचे प्रशस्त हॉटेल आहे. ताईंच्या आग्रहास्तव आम्ही त्यांच्या हॉटेलमध्ये गेलो आणि अगदी घरी नाष्टा करावा असा चविष्ट नाष्टा कसला जेवणच केले.

संगमनेर येथील विश्रामगृहावर पोहोचताच मित्रवर्य संदीप वाकचौरे यांनी स्वागत केले. त्यांच्यासोबत प्रसिद्ध साहित्यिक, साहित्य अकादमी बालकुमार पुरस्कारप्राप्त एकनाथ आव्हाड आणि ज्येष्ठ लेखक गोविंद गोडबोले ह्या दोघांची भेट झाली. थोडावेळ गप्पा रंगल्या. पुन्हा एकदा नाष्टा, चहा झाला. सकाळी दहाच्या सुमारास आम्ही सहकारमहर्षी भाऊसाहेब सं. थोरात वरिष्ठ महाविद्यालय, संगमनेर या भव्य वास्तुच्या प्रांगणात पोहोचलो. महाविद्यालयाचा भव्य आणि सुशोभित परिसर पाहून मन प्रसन्न झाले. तिथे पोहोचताच श्री. दत्तात्रेय आरोटे, प्राचार्य वाघ यांनी सन्मानपूर्वक कार्यालयात नेले. तिथे सौ. दुर्गाताई तांबे यांनी महाविद्यालयाच्या वतीने आमचा सत्कार केला. मागोमाग चहाचे कप आले. त्यावेळीच नाही तर दोन दिवस जेव्हा जेव्हा कार्यालयात जाण्याचा योग आला तेव्हा हक्काने चहा, कॉफी, लेमन टी पिण्याचा आग्रह करणारे, कुणी नकार दिलाच तर... 'असं कसं तुम्ही चहा घेतला नाही तर माझी मेहनत फुकट जाईल त्याचे काय?' किंवा 'घ्या हो, देवाचा प्रसाद आहे, घ्या.' अशी प्रेमपूर्वक गळ घालणारे सोबतच जेवणात विविध पदार्थांची गरमागरम मेजवानी देणारे श्री. तुषार गायकर आणि सुरेश शिंदे यांचे आदरातिथ्य मनाला भिडत होते. संगमनेरच्या यजमानांची 'अतिथी देव भव' ही वृत्ती नमन करणारी अशीच. सौ. दुर्गाताई तांबे ह्यांनी उद्घाटनप्रसंगी केलेले मनोगत त्यांच्या साहित्यावरील प्रेमाची नि निष्ठेची पावती देत होते. श्री. संदीप वाकचौरे ह्यांचे सूत्रसंचालन लक्षवेधक असेच! उद्घाटनप्रसंगी नागेश शेवाळकर यांच्या 'पवनपुत्र हनुमान' आणि भरत पाटील यांनी लिहिलेल्या 'फुलताना' या संग्रहाचे थाटात प्रकाशन झाले. लाडोबा महोत्सवातील पहिल्या दिवसाच्या पहिल्या सत्रातील पहिले पुष्प गुंफले ते ख्यातकीर्त बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी! त्यांनी आपला साहित्य प्रवास रंजकतेने, प्रसंगी काव्य सादर करुन कथन केला. त्यांची कविता वाचून विदर्भातील एका बालवाचकाने स्वतःच्या पुस्तकात सांभाळून ठेवलेले मोराचे पीस पाठवले ही हृदयस्पर्शी कथा सांगितली आणि श्रोते अवाक् झाले. आव्हाड यांनी लेखन आणि वाचन या संदर्भात विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. त्यांच्या साभिनय संवाद कौशल्याने श्रोते मंत्रमुग्ध झाले.

अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष गोविंद गोडबोले यांचा ऐक्याऐंशीव्या वर्षी असलेला उत्साह, तळमळ, हावभाव आणि सादरीकरण पाहून शिक्षक, पालक,विद्यार्थी आणि लेखक आश्चर्यचकित झाले. अनेक पिढ्यांना माहीत असलेली, वारंवार ऐकलेली 'ससा आणि कासव' ही गोष्ट ससा नि कासव यांच्या चार पिढ्यांमध्ये रंगलेल्या शर्यतीचे वर्णन साभिनय नि अनोख्या आवाजात सादर केले. बालकांना त्यांनी योग्य मार्गदर्शनही केले.

'चला कविता लिहूया...' ह्या सत्रात एरोनॉटिकल इंजिनिअर ही उच्च पदवी प्राप्त असलेल्या, चित्रपट गीतकार असूनही बालकांमध्ये रमणाऱ्या, त्यांनी वाचावे, लिहावे ही तळमळ असणाऱ्या लाडोबा मासिकाच्या ऑनलाईन संपादक सौ. ज्योती घनश्याम यांनी सखोल, अभ्यासपूर्ण असे मार्गदर्शन केले. कविता लिहिताना त्यांनी त्यातील विविध बारकावे सोदाहरण सादर केले. विद्यार्थ्यांनी लिहिते व्हावे या त्यांच्या तळमळीला, आवाहनाला विद्यार्थ्यांनी तत्काळ उत्तम प्रतिसाद दिला. काही विद्यार्थ्यांनी दुसऱ्या दिवशी ज्योती यांना कविताही लिहून दिल्या. तो प्रतिसाद पाहून ज्योती घनश्याम यांनी त्यांना स्वतःचा संपर्क क्रमांक दिला आणि 'तुम्ही जे काही लिहाल ते मला पाठवा. तुम्हाला केव्हाही मदत करायला मी तयार आहे' असे आवाहन केले. त्यांनी स्पष्ट केलेले मुद्दे ऐकताना एक लेखक–वाचक म्हणून मलाही अनेक गोष्टी नव्याने समजल्या.

सध्या अभिवाचन हा साहित्य किंवा वाचन प्रकार ही कला आत्मविश्वासाने पुढे नेणाऱ्या काही व्यक्ती आहेत. विशेषतः आजची तरुणाई या क्षेत्राकडे आकर्षित होत आहे. यावरुन वाचन संस्कृती लयाला जात आहे या चर्चेला परस्पर उत्तर मिळत आहे. 'अभिवाचन कला फुलवा' हे रसिका आणि अक्षय यांचे सत्र उल्लेखनीय ठरले. त्यांनी वाचन आणि अभिवाचन यातील फरक स्पष्ट करताना प्रथम बाराखडीचे वाचन कसे करावे सोदाहरण स्पष्ट केले. मनोरंजनातून अभिवाचन हा त्यांच्या सत्राचा आत्मा होता. वेगवेगळे आवाज काढणे, हास्यलहरी फुलवणे हे सारे श्रोत्यांच्या पसंतीला उतरत होते, त्यामुळे दोघांचाही उत्साह शिगेला पोहोचला होता. या सत्राने पहिल्या दिवसाची सांगता झाली. विद्यार्थ्यांनी दिलेला प्रतिसाद पाहून सादरकर्त्यांचा उत्साह, मनोबल निश्चितच वाढले. अधूनमधून ताकाची मेजवानी सर्वांना आवडली.

पहिला दिवस संपला. दिवसभर सोबत असणाऱ्या सौ. दुर्गाताई पुन्हा कार्यालयात घेऊन गेल्या. त्यांचा आग्रह मोडता आला नाही. चहाचा आस्वाद घेत असताना सौ. तांबे यांना डॉ. तांबे यांचा भ्रमणध्वनी आला. ते येत असल्याचा निरोप त्यांनी दिला. त्यामुळे उपस्थितांमध्ये स्फूर्तिदायक वातावरण निर्माण झाले. डॉ.सुधीर तांबे साहेब येईपर्यंत संगमनेर येथील खास भेळ आमच्यापुढे आली. नाही म्हणायची संधी नव्हती... हक्काचा प्रेमळ हट्ट टाळताच आला नाही. डॉ. सुधीर तांबे यांचे आगमन झाले. डॉ.सुधीर तांबे दिवसभर इतर कामांमध्ये व्यग्र असतानाही आपल्या शहरात आणि आपल्या संस्थेत आलेल्या पाहुण्यांची भेट घेण्याची त्यांची तळमळ मनाला भिडणारी होती. त्यांच्यासोबतच्या गप्पा म्हणजे महोत्सवातील एक चर्चासत्रच होते असे म्हणावे लागेल.

विश्रामगृहावर पोहोचताना संगमनेर येथील साहित्यिक आणि चपराक परिवारातील लेखक यांचा आग्रह मोडणे शक्यच नव्हते. तसेच उच्च पदावर काम करताना सौ. काळेताईंनी जोडलेली माणसे भेटायला येत होती. घरी येण्याचा आग्रह करत होती. प्रत्येकाचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. रात्री साडेआठच्या सुमारास विश्रामगृहावर पोहोचलो. वास्तविक भूक नव्हती परंतु पुन्हा आग्रह मोडता आला नाही. जेवण करून खोलीवर परतताच खूप मस्त झोप लागली...!

२७ एप्रिल दुसरा दिवस! सात वाजता चहा तयार! साडेआठ वाजता नाष्टा– चहा होत असताना श्री. संदीप वाकचौरे ह्यांचे आगमन झाले. आम्ही महोत्सवस्थळी जात असताना काही यजमान आमची वाट पाहत होते. त्यामुळे एक–दोन घरी धावती भेट देऊन आम्ही साडेदहाच्या सुमारास महोत्सव ठिकाणी पोहोचलो. रविवार असूनही विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्ष वेधून घेत होती. उद्घाटनप्रसंगी सौ. शकुंतला काळे यांचे श्रवणीय, विद्वत्तापूर्ण भाषण ऐकायला मिळालेच होते. तोच धागा पकडून सौ. शकुंतला काळे यांनी पहिले सत्र सुरू करताना सभागृहासमोर वाचनाचे, लेखनाचे महत्त्व विशद केले. त्यांचे अनुभव सांगताना ऐकणाऱ्यांचे डोळे पाणावले. जेमतेम पंधरा वर्ष वय असलेल्या मुलीचे लग्न ठरते, तेव्हा त्या काळातील तरुणी पतिदेवाच्या कुटुंबीयांसमोर एक अट घालते, ती मान्य असेल तरच मी लग्न करायला तयार आहे, अन्यथा नाही. कोणती होती अट? लग्नानंतर त्या मुलीची इच्छा असेल तोवर शिक्षण घेण्याची परवानगी! सासरच्या मंडळींनी ती अट मान्य केली आणि नवरी बोहल्यावर चढली परंतु खरा संघर्ष सुरू झाला. संसार सुरू झाला... खडतर प्रवास सुरू झाला. एकामागोमाग एक परीक्षा उत्तीर्ण करत, नोकरीत एक–एक पायरी चढत जाणारी ती कन्या शिक्षिका, प्राध्यापक असा प्रवास करताना महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची अध्यक्ष होते. हा चित्तथरारक प्रवास ऐकणारे मंत्रमुग्ध झाले नसतील हे शक्यच नाही. हा प्रेरणादायी प्रसंग सांगून डॉ. शकुंतला काळे यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षक पालकांचेही उत्कृष्ट उद्बोधन केले.

दुसरे सत्र! लेखकांशी गप्पा या सत्रात प्रथम नागेश शेवाळकर यांनी विद्यार्थ्यांना प्रश्नांच्या माध्यमातून बोलते केले. विद्यार्थ्यांच्या आवडी जाणून घेताना काही विद्यार्थ्यांनी 'मोबाईल' असे उत्तर देताच त्यांनी भ्रमणध्वनीचे महत्त्व विशद करून त्याचे तोटेही

### प्रासंगिक

सांगितले. मोबाईलचा अनावश्यक आणि अतिवापर होत असल्यामुळे 'ब्रेन रॉट' हा आजार जडत असल्याचे सांगून त्या आजाराची लक्षणे सांगून हा आजार कसा टाळावा असा प्रश्न विचारताच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे 'मोबाईल कमी वापरावा' असे उत्तर दिले. सोबतच त्यांनी खेळाचे महत्त्वही स्पष्ट केले.

प्रशांत केंदळे ह्या कवीने अल्पावधीतच रसिकांच्या, वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. त्यांची 'गुलमोहोराचं कुकू' ही कविता प्रचंड लोकप्रिय झाली आहे. अनेक गायकांनी त्या कवितेला आवाज दिला आहे. घनश्याम पाटील यांनी त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित केला आहे. घनश्याम–ज्योती यांच्या लग्नात ही कविता मंगलाष्टक म्हणून गायिली हे सांगताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. प्रशांत यांनी कविता लेखनविषयक अनुभव सादर करताना अनेक कवितांचे धारदार आवाजात, साभिनय सादरीकरण केले. तेव्हा विद्यार्थ्यांनी नकळत साथ दिली.

संगमनेर येथील भूमीपुत्र, लेखक, पत्रकार संतोष खेडलेकर ह्यांनी विद्यार्थ्यांशी, शिक्षकांसोबत गप्पा मारताना शुद्धलेखनाचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच 'व्यस्त' हा शब्द हिंदी भाषेचा असूनही आपण सरसास मराठीत त्याचा वापर करतो. व्यग्र हा मराठी शब्द आपण दुर्लक्षित करतो हे निदर्शनास आणले तेव्हा शुद्धलेखनासाठी आग्रह धरणारे घनश्याम पाटील यांच्याकडे उपस्थित चपराक परिवारातील सदस्यांचे लक्ष गेले. 'व्यस्त ऐवजी व्यग्र वापरा' हा पाटलांचा कटाक्ष नि आग्रह असतो.

शशिकांत शिंदे यांची एक कविता आणि एक स्थानिक कवी अशा दोघांनी आपल्या कविता सादर करताना उपस्थितांची मने जिंकली. दुसऱ्या दिवशी मित्रवर्य संदीप वाकचौरे हे एका कार्यशाळेसाठी हैद्राबाद येथे जात असल्यामुळे दुसऱ्या दिवशीच्या विविध सत्रांचे बहारदार सूत्रसंचालन श्री. दत्तात्रय आरोटे यांनी केले. त्यांचा एकूण वावर आश्वासक होता.

दोन दिवस अत्यंत उत्साहपूर्ण वातावरण चाललेल्या लाडोबा महोत्सवाचा समारोप डॉ. सुधीर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. त्यांच्या मनोगतातून त्यांची साहित्य विषयाची आस्था नि प्रेम जाणवले. त्यांच्या स्वतःच्या वाचनालयात हजारो पुस्तके आहेत हे समजताच त्यांच्याबद्दलचा आदर दुणावला. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सौ. दुर्गाताई तांबे ह्या स्वतः नगराध्यक्ष असतानाही त्यांची साहित्यविषयक तळमळ तेव्हा जाणवली जेव्हा त्यांनी स्वतः संकलित केलेले 'पारंपरिक ओव्या' हे पुस्तक आम्हाला भेट दिले. 'ओवी'कार सर्व महिला ह्या संगमनेर आणि नाशिक परिसरातील आहेत. बहुतांश महिलांना अक्षरओळख नाही. एक महिला दहावी, दुसरी बारावी तर काही महिलांचे शिक्षण हे तिसरी–चौथीपर्यंत झाले आहे. त्यांच्या ओव्या ह्या स्वयंस्फूर्त आणि उद्बोधक आहेत.या महिलांना आणि त्यांच्या रचनांना समाजापुढे ठेवण्याचे पावन कार्य सौ. दुर्गाताईंच्या हातून घडले ही फार मोठी समाजसेवाच आहे. तांबे दांपत्याचा आदर्श सर्वांनी अंगीकृत करावा असाच आहे.

समारोपानंतर उत्कृष्ट भोजनाचा आस्वाद घेऊन संगमनेरकरांचे आदरातिथ्य आणि साहित्य प्रेम लक्षात घेऊन जड अंतःकरणाने आम्ही निरोप घेतला. मार्गस्थ होण्यापूर्वी पुन्हा एकदा काही व्यक्तिंचा आग्रह मोडता आला नाही. धावती भेट देत आम्ही पुण्यनगरीकडे मार्गस्थ झालो. संस्मरणीय आठवणींची शिदोरी सोबत होती.

हे संमेलन माझ्या कायम लक्षात राहिल ते 'पवनपुत्र हनुमान' या पुस्तकाचे झालेले दमदार, थाटामाटात झालेले प्रकाशन! तसेच माझे शेवाळकर आडनाव समजताच गुरुवर्य राम शेवाळकर यांच्या आठवणींना मिळणारा उजाळा! ही चर्चा माझ्यासाठी नेहमीच एक आनंदोत्सव असतो.अशारीतीने एका संस्मरणीय महोत्सवात भाग घेऊन, भरपूर अशी अवीट शिदोरी घेऊन निघालो...

**नागेश शेवाळकर, पुणे**
**मोबाईल – ९४२३१३९०७१**

### विशेष

## सुट्टी बनवा अर्थपूर्ण

परीक्षेचा शेवटचा पेपर झाला की, दप्तर कोपऱ्यात फेकून सुट्टीची धमाल सुरु! ही भावना काही दशकांपूर्वी मुलांच्या मनात असायची. मामाच्या गावी जाणं, आंब्याच्या बागेत खेळणं, पाण्यात डुंबणं, पत्ते–लुडो खेळत दिवस काढणं हीच होती ती 'सुट्टी'. पण आता काळ बदलला आहे. सुट्ट्या म्हणजे फक्त धमाल नाही तर स्वतःला घडवण्याची, काहीतरी नवीन शिकण्याची, आणि भविष्यासाठी सज्ज होण्याची एक उत्तम संधी मानली जाऊ लागली आहे.

अलिकडच्या काळात मुलं आणि पालक दोघेही सुट्यांचा उपयोग 'वेळेचा सदुपयोग' करण्यासाठी करत आहेत. अभ्यासाव्यतिरिक्त छंद जोपासणं, करिअरची दिशा ठरवणं, कौशल्यं विकसित करणं, हे आता महत्त्वाचं झालं आहे. पण याचं प्रमाण इतकं वाढलं आहे की, सुट्टीची गंमत कुठे हरवते आहे का, असा प्रश्नही कधीमधी निर्माण होतो.

**छंद जोपासा, नवे शोधा**

एका विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा खरा विकास त्याच्या अभ्यासाच्या पलीकडच्या आवडींमध्ये होतो. सुट्टीत एखादा वाद्य वाजवणं शिकणं, चित्रकला, नृत्य, लेखन, कॅलिग्राफी, गिटार किंवा फोटोग्राफी सारखे छंद जोपासणं हे सगळं आत्मिक समाधान देणारं असतं. आजच्या स्पर्धात्मक जगात 'तुमच्यात वेगळं काय आहे?' हा प्रश्न विचारला जातो. याचं उत्तर तुमच्या या छंदात असू शकतं.

समर कॅम्प्स, शॉर्ट टर्म कोर्सेस हे केवळ वेळकाढूपणासाठी नसतात, तर ते तुमच्या आत दडलेल्या कलागुणांना एक दिशा देतात. नृत्याच्या विविध प्रकारांपासून (जसे की हिप–हॉप, साल्सा, लासिकल), चित्रकलेच्या वर्कशॉप्सपासून ते रोबोटिक्स, कोडिंगसारख्या नव्या गोष्टींपर्यंत या सर्व उपक्रमांमधून तुमचा आत्मविश्वास, संवाद कौशल्यं, टीमवर्क हे गुणही बळकट होतात.

**भविष्यातील करिअरसाठी दिशा**

दहावी, बारावी नंतरच्या सुट्या तर खूपच महत्त्वाच्या असतात. त्या काळात विविध अभ्यासक्रम, करिअर ऑप्शन्स याचा शोध घेता येतो. कोणाला डॉक्टरी करायचीय, कोणाला इंजिनिअरिंग, तर कोणाला आर्ट्स किंवा डिझाइनमध्ये करिअर घडवायचंय. अशा वेळी, त्या क्षेत्राशी संबंधित एखादा ऑनलाईन कोर्स, इंटर्नशिप किंवा मार्गदर्शन शिबिर खूप उपयोगी पडतं. काही मुलं स्पर्धा परीक्षा द्यायचा विचार करत असतील, तर जीके, चालू घडामोडी याचा अभ्यास सुरु करण्यासाठी हीच वेळ आहे. युपीएससी, एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये आवश्यक असलेल्या वाचन, लिखाण, चर्चा या सवयी या काळात लावून घेतल्या पुढील वाटचालीत ते खूप फायदेशीर ठरेल.

**अनुभवातून शिकणं**

सुट्टीत एखादा पार्टटाईम जॉब करणे हा अनुभव आयुष्यभर कामी येतो. टायपिंग, डेटा एंट्री, डिलिव्हरी, बुक स्टोअर किंवा लायब्ररीत काम, हॉटेल मॅनेजमेंटची प्राथमिक ओळख, टुरिस्ट गाईडसारखे काम अशा छोट्या कामांमधून तुमच्या कौशल्यांचा, माणसांशी संवाद साधण्याच्या क्षमतेचा विकास होतो. काही वेळा हेच लहानसहान अनुभव तुम्हाला एखाद्या मोठ्या करिअरकडे घेऊन जातात. उदाहरणार्थ, कोणीतरी फोटोग्राफी शिकतो आणि मग त्यातूनच तो पुढे प्रोफेशनल फोटोग्राफर बनतो. सुट्टीचा हा छोटासा प्रयोग आयुष्याची दिशा ठरवतो.

**कौटुंबिक जबाबदारी आणि स्वावलंबन**

आज मुलांना फक्त शिक्षणच नाही, तर स्वावलंबी होण्याची गरज आहे. सुट्टीत आई–बाबांना मदत करणे, घरगुती खरेदी करणे, बजेट ठरवून खर्च पाहणे, स्वयंपाक शिकणे या गोष्टींनी फक्त कौशल्यच वाढत नाही तर जबाबदारीही येते.आज जगात 'लाइफ स्किल्स' या संकल्पनेला खूप महत्त्व आहे. सुट्टी हा त्या कौशल्यांचा पाया घालण्यासाठी सर्वोत्तम काळ आहे. स्वतःचं खोली आवरणं, कपडे धुणं, साधा जेवणाचा डबा बनवणं ह्न या सगळ्या गोष्टी शिकल्या की कुठेही राहायची वेळ आली तरी तुम्ही खंबीर राहू शकता.

**सामाजिक कार्याचे संस्कार**

आपल्या आजूबाजूला अशा अनेक संस्था, एनजीओ कार्यरत आहेत ज्या उन्हाळी सुट्टीच्या काळात सामाजिक कार्याचे शिबिर घेतात. गरीब मुलांना शिकवणे, वाचनालयात स्वयंसेवक म्हणून मदत करणे, वृक्षारोपण मोहिमा, प्लास्टिकमुक्ती अभियान यासारख्या उपक्रमांमध्ये भाग घेता येतो. समाजासाठी काहीतरी करायचं, हे संस्कार लहान वयातच झाले तर पुढील आयुष्यात त्या मुलांमध्ये जबाबदारीची भावना अधिक ठामपणे विकसित होते.

**आर्थिक साक्षरता**

या काळात मुलांनी आर्थिक साक्षरतेचाही थोडा अनुभव घ्यावा. आईवडिलांसोबत बँकेत जाणे, एटीएमचा वापर कसा करायचा, गुंतवणूक म्हणजे काय, याची प्राथमिक माहिती घेतल्यास पुढील काळात ती लाभदायक ठरते. मुलांमध्ये बजेटिंगचा शहाणपणा विकसित होतो. उन्हाळी सुट्टी ही केवळ शाळा नसलेला रिकामा वेळ नसतो, ती एक अमूल्य संधी असते ह्न जीवन कौशल्यं आत्मसात करण्याची. या काळात मुलांनी बरोबर काम करणं, गटात विचार मांडणं, सहकारभाव शिकणं ह्न या सगळ्या 'सॉफ्ट स्किल्स'चा सराव होऊ शकतो. नाटक, गाणं, वाचनसंमेलन, वक्तृत्व स्पर्धा यांचा अभ्यास करून हे गुण विकसित करता येतात. अनेक वेळा घरात शांत वेळ मिळत नाही, सतत मोबाइल किंवा टीव्हीचा वापर सुरू असतो. या सगळ्यापासून दूर जाऊन एक छोटीसी 'डिजिटल डिटॉक्स' सुट्टी मुलांनी स्वतःसाठी घ्यावी. यामध्ये काही दिवस मोबाइल, सोशल मीडिया वापरणं बंद करून पुस्तकं वाचणं, हस्तकला करणं, मनाशी संवाद साधणं असे आत्ममंथनाचे प्रयोग करता येतात. यामुळे एकाग्रता वाढते, मानसिक शांतता लाभते आणि खऱ्या अर्थाने 'रिचार्ज' होता येतं.

**मजाही हवी आणि विश्रांतीही**

हे सगळं करताना एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, सुट्टीचा खरा अर्थ विश्रांती आणि विरंगुळा. केवळ कोर्सेस, वर्ग, अभ्यास यात वेळ घालवून मुलांना थकवू नये. सुट्टीत काही दिवस बेफिकीरपणे मित्रांबरोबर खेळणं, नातेवाईकांकडे जाणं, गप्पा, चित्रपट, ट्रेकिंग, भटकंती ही सगळी मजा देखील तितकीच आवश्यक आहे. मुलांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी हे तितकंच महत्त्वाचं आहे. सततचा अभ्यास, कामं यामध्ये त्यांचं बालपण हरवू नये. सुट्टीत 'नो प्लॅन डे' ठेवून काहीही न करता झोपणं, पुस्तक वाचणं किंवा निवांत वेळ घालवणं हे सुद्धा एक कौशल्य आहे!

**पालकांची भूमिका महत्त्वाची**

मुलांच्या सुट्टीचं नियोजन करताना पालकांनी त्यांच्यावर स्वतःच्या अपेक्षा लादू नयेत. त्यांच्या आवडी, स्वभाव, क्षमता समजून घ्याव्यात. मुलांना वेगळं, नविन काही करण्याची संधी दिली तर त्यांच्यातील सुप्त गुण उजळून निघतील. सुट्टीचा अतिरेकी वापर न करता, त्या काळाचा समतोल उपयोग करावा.

**– कॅप्टन नीलेश गायकवाड**

पान १ वरुन

**शिवसेना कार्यालयाच्या शुभारंभातून 'उबाठा'ला खिंडार?**

पदाधिकाऱ्यांनी सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांचा विचार रुजवणाऱ्यांनाच लक्ष्य करुन त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवल्याने पक्षातील जून्या शिवसैनिकांची मुस्कटदाबी सुरु झाली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही पक्षात वाढत असलेल्या विस्कळीतपणाकडे दुर्लक्ष केल्याने असंख्य शिवसैनिक दुखावले गेले. त्यातच २०१९ मध्ये पक्षाने विचारधारा टांगणीला ठेवून काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत आघाडी स्थापन केल्याने पक्षातील नाराजांच्या संख्येत अधिक वाढ झाली. या स्थित्यंतरातून मुखवटे धारण केलेल्यांना उघड भूमिका घेण्याची संधी प्राप्त झाल्याने निष्ठावान कार्यकर्ते शिवसेनेपासून अधिक लांब होत गेले. एकनाथ शिंदे यांच्या बंडाळीने अशाकाही नाराजांना विचारांची जागा मिळाली खरी, मात्र बहुतेकांनी अलिप्त राहण्याचे धोरण स्वीकारुन राजकारणापासून अंतर साधले.

दुसरीकडे सिटीझनविल पुस्तकाच्या प्रकाशनातून तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी जवळीक साधण्याची संधी मिळालेल्या सत्यजीत तांबे यांनी पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत पक्षाने राजकीय अन्याय केल्याची भूमिका घेत अपक्ष उमेदवारी दाखल केली. तेव्हापासूनच त्यांचा राजकीय प्रवास निश्चित झाल्याचे मानले जावू लागले होते. या निवडणुकीत विजयी झाल्यानंतरही त्यांनी काँग्रेसमध्ये परतण्याचे कोणतेही प्रयत्न केले नाहीत. उलट आपल्या मतदारसंघातील विविध कामे घेवून उपमुख्यमंत्र्यांच्या दालनात आणि कधीमधी सागर निवास्थानीही त्यांचा वावर वाढल्याने देवेंद्र फडणवीस त्यांचा 'ब्रह्मास्त्रा'सारखा वापर करतील का? अशाही राजकीय वावड्या उठल्या. विशेष म्हणजे पदवीधरच्या निवडणुकीत थोरातांचे पारंपरिक राजकीय विरोधक असलेल्या विखे-पाटलांनीही त्यांना साथ दिली होती. त्यातून जिल्ह्याच्या राजकारणाचे बदलते चित्रही समोर आले.

सहा महिन्यांपूर्वी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचा अनपेक्षित पराभव झाल्यापासून संगमनेर मतदारसंघातील राजकीय संघर्षाला नवीन धार आली आहे. विशेष म्हणजे तब्बल अडीच दशके काँग्रेस विचारांशी बांधील राहिलेल्या आमदार सत्यजीत तांबे यांनी या निवडणुकीनंतर संगमनेर तालुक्याला डोळ्यासमोर ठेवून राजकीय सक्रियता वाढवण्यासह भगव्या झेंड्याकडे कलायला सुरुवात केल्याने स्थानिक भाजपमधील अस्वस्थताही वाढत होती. अशातच गेल्याकाही दिवसांत त्यांच्या थेट भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरु झाल्याने गेल्या अनेक दशकांपासून थोरात-तांबे यांना राजकीय विरोध करीत आयुष्य खपवणाऱ्या भाजपमध्ये संभ्रम आणि निराशा निर्माण होवू लागली आहे. सोशल माध्यमातून त्याचे प्रतिबिंबही उमटण्यास सुरुवात झाल्याने स्थानिक भाजपमधून त्यांच्या नावाला विरोध असल्याचे ठळक होत असताना निर्माण झालेल्या अवस्थेचा पुरेपूर फायदा घेत शिवसेनेचे आमदार अमोल खताळ यांनी पक्षाच्या विस्तारावर लक्ष केंद्रीत केले आहे.

मंगळवारी (ता.२९) तालुक्यातील संगमनेर खुर्द, निमगाव, रायतेवाडी, झोळे अशा वेगवेगळ्या गावांमधील काही आजी-माजी पदाधिकाऱ्यांसह उबाठागटातील अनेकांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर आता त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शहरातील दुखावलेल्या निष्ठावान शिवसैनिकांना गोंजारण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या या प्रयत्नांना मोठ्या प्रमाणात यश आल्याचेही चित्र असून उबाठागटाला एकाचवेळी चोहोबाजूने खिंडार पाडण्याचे नियोजन केले जात आहे. त्यासाठी शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या शुभारंभाचा मुहूर्त ठरवण्यात आला असून या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याच उपस्थितीत आजच्या स्थितीत अडगळीत गेलेल्या निष्ठावानांसह उबाठाच्या असंख्य शिवसैनिकांचा शिंदेगटात जाहीर प्रवेश होणार असल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे आगामी काळात आमदार सत्यजीत तांबे यांचा भाजप प्रवेश झाल्यास त्या पक्षातून दुखावलेल्यांनाही शिवसेनेत घेण्याचे नियोजन होत असल्याने येणाऱ्या काळात संगमनेरच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडण्याची दाट शक्यता आहे.

**भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत खांडगाव ग्रामपंचायत जिल्ह्यात अव्वल**

जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल खांडगाव ग्रामपंचायतीला भूजल व्यवस्थापनासाठी ५० लाख रुपयांचे बक्षीस प्राप्त होणार असून, गावाची राज्यस्तरावर स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशासाठी परिश्रम करणारे सरपंच ॲड. विकास गुंजाळ, शम्प्रोचे संचालक माजी सरपंच सोमनाथ गुंजाळ, उपसरपंच सुनील रुपवते, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी उज्वला नवले, कर्मचारी आणि सहकार्य करणाऱ्या सर्व ग्रामस्थांचे कौतुक होत आहे. युवा सरपंच ॲड.विकास गुंजाळ व उपसरपंच सुनिल रुपवते यांनी अवघ्या एका वर्षात गावाला एक कोटी रुपयाचे बक्षीस मिळवून दिले आहे.

**आश्वी, घारगाव, लोणी परिसरात गुन्हे शाखेचे छापे!**

निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार आश्वी, घारगाव, लोणी परिसरात अवैध दारू विक्री होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती.त्यानुसार पथकाने सापळा रचून आश्वी पोलीस ठाण्यात,घारगाव पोलीस ठाण्यात चार, लोणी पोलीस ठाण्यात तीन, तर राहाता पोलीस ठाण्यात दोन असे एकूण १५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, बापुसाहेब फोलाणे, बिरप्पा करमल, गणेश लोंढे, पंकज व्यवहारे, बाळासाहेब नागरगोजे, सोमनाथ झांबरे, रवींद्र घुंगासे, किशोर शिरसाठ, विशाल तनपुरे, जालींदर माने, रणजीत जाधव, उमाकांत गावडे व महादेव भांड यांच्या पथकाने केली.

# राजुरमध्ये काविळीचा कहर

## पाणी पुरवठा मंत्र्यांकडे तक्रार करणार : आ. डॉ. लहामटे

**नायक वृत्तसेवा, अकोले**



तालुक्यातील राजुर येथे काविळीची साथ मोठ्या प्रमाणावर पसरल्याने तसेच या साथीमुळे एका २० वर्षीय तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ग्रामस्थांनी सोमवारी ग्रामपंचायत कार्यालयावर जाऊन ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचा निवेदन दिले.

आमदार डॉ. किरण लहामटे यांनी काविळ बाधित रुग्णांची राजूर ग्रामीण रुग्णालयात जाऊन भेट घेत विचारपूस केली. तेथूनच आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला. रुग्णांच्या उपचारासाठी स्वतंत्र बेड व्यवस्था,डॉक्टर, आरोग्य कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत पुरेसा औषधसाठा उपलब्ध करून देण्याची सूचना केली. गावाला शुध्द पाणी पुरवठा व्हावा यासाठी ग्रामपंचायत व पाणीपुरवठा विभागाने तातडीने प्रयत्न करावेत, अन्यथा पाणी पुरवठा मंत्र्यांकडे तक्रार करण्याचा इशारा आ.लहामटे यांनी दिला,

ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निष्काळजी पणावर तीव्र नाराजी व्यक्त करत गावात तातडीने आरोग्य सुविधा उपलब्ध कराव्यात, स्वच्छतेची योग्य व्यवस्था करावी तसेच साथीवर नियंत्रण मिळविण्यासाठी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली. मोर्चा दरम्यान ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, आरोग्य विभागाने गावात आपत्कालीन पथके रवाना करून तपासणी मोहीम सुरू केली आहे. नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. कावीळ आजाराचा मागील पंधरा दिवसांपासून प्रादुर्भाव झाल्यानंतर या आजारात शनिवारी एका तरुणीचा बळी गेल्यानंतर आणि ही साथ अद्यापही आटोक्यात न आल्याने राजूर ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयावर जाऊन प्रशासनास निवेदन दिले.

यावेळी माजी सरपंच गणपत देशमुख,संतोष मुतडक ,गंगाराम धिंदळे,अविनाश बनसोडे, निलेश साकुरे, दौलत देशमुख, गोकुळ कानकाटे, गणपत देशमुख, लता सोनवणे ॲड. दत्तात्रय निगळे,संतोष नांदवाणी,अनंत घाणे,सचिन देशमुख,किशोर देशमुख यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अनेक गोर गरीब नागरिकांचे कुटुंबातील सदस्य कावीळ आजाराने रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यामुळे त्यांनी प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा निषेध केला. आरोग्य विभागाने एक पथक येथे काही दिवस ठेवावे, आम्हाला फक्त पाणी हवे आहे,दिवसाआड पाणी पुरवठा होत असतो मात्र पाणी पट्टी वर्षाची भरावी लागते असे सांगितले.

पंधरा दिवसापासून कावीळची साथ सुरू असताना ग्रामपंचायतची एकही बैठक झाली नाही या बाबत खेद व्यक्त केला. प्रशासन गावाला शुद्ध पाणीपुरवठा करू शकत नाही तर तुम्ही राजीनामे द्यावा अशी मागणी त्यांनी केली. ग्रामपंचायतचा कारभार बोगस पद्धतीने सुरू असून भष्टाचार होत असल्याचा आरोप त्यांनी केला. करण्यात आलेल्या विकास कामांची चौकशी करा. फिल्टरेशन प्लांट बंद करून डायरेक्ट नदीतून येणारे पाणी सोडले जाते. मेडिकलोअर पुरविण्याचे जाहीर केले मात्र अद्यापही घरोघर हे मेडिकलोअर पोहचले नाही. निवडणुकीतील आश्वासने विसरले तरी चालेल मात्र ग्रामस्थांना शुद्ध पाणी पुरवठा करावा अशी मागणी त्यांनी केली.आजारी रुग्णांची जबाबदारी ग्रामपंचायतने घ्यावी असे आवाहन केले. अन्यथा पुन्हा जोरदार आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

# फिजा सय्यद हिची जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी निवड

**नायक वृत्तसेवा, अकोले**

येथील आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू फिजा सय्यद हिची अहिल्यानगर जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी खुरगे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सॉफ्टबॉल क्रीडा प्रकारात केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल सन २०१९ - २० या वर्षीचा जिल्हा क्रीडा पुरस्कार फिजा फत्तू सय्यद हिला घोषित केला आहे.



१ मे महाराष्ट्र दिनी अहिल्यानगर येथे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.फिजा सय्यद ही सॉफ्टबॉल खेळाडू असून अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धा मध्ये तिने उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. तिच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार घोषित झाला असून तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पाझर तलाव दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करा : आ.खताळ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



निळवंडेच्या डाव्या कालव्याचे पाणी वेल्हाळेच्या पाझर तलावात सोडले तर या भागातील पाण्याची समस्या दूर होण्यास मदत होईल. अशी मागणी या भागातील ग्रामस्थांनी आपल्याकडे केली आहे.त्यानुसार या पाझर तलाव दुरुस्तीचे काम जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर पूर्ण करावे असे निर्देश आ. अमोल खताळ यांनी जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

तालुक्यातील वेल्हाळे येथील पाझर तलाव दुरुस्ती कामाचा शुभारंभ आ. अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर सरपंच विष्णू आव्हाड, जलसंधारण विभागाचे उपअभियंता कपिल बिडगर,किशोर भांड, अशोक ननावरे,बाळासाहेब जेडगुले ,सतीश सोलाट,शांताराम सोनवणे,भानुदास सोनवणे, ज्ञानेश्वर सोनवणे, रोहन भागवत, गणेश सोनवणे, योगेश सोनवणे, शंकर भांड, हरिभाऊ भांड, गोकुळ सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

येथून मागील कालावधीत उन्हाळ्यात पाणी होते का? असा सवाल करत आमदार खताळ म्हणाले, शेतीला पाणी मिळावे तसेच पाणी टंचाई दूर व्हावी यासाठी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून उन्हाळ्याच्या कालावधीत शेतीसाठी प्रवरा नदी पात्रातून तसेच निळवंडे डाव्या व उजव्या कालव्यातून पाणी सुरू आहे. या पाझर तलावात जर कोणाचे अतिक्रमण असेल तर ते काढून घ्यावे. भविष्यात तुम्हालाच या पाझर तलावातुन पाणी उपलब्ध होणार आहे. यासाठी प्रत्येकाने समन्वयातून मार्ग काढून अधिकाऱ्यांना सर्वांनी सहकार्य करावे आणि या पुढील काळात वेल्हाळे गावात पाण्याची समस्या निर्माण होणार नाही.यासाठी या पाझर तलावाची जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अंदाज पत्रकानुसार दुरुस्ती करावी असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. वेल्हाळे गावाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. आणि येथून पुढेही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माझ्या माध्यमातून निधीची कुठलीही कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

- तालुक्यातील वेल्हाळे गावासाठी आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून अवघ्या सहाच महिन्यात ६५ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. या निधीच्या माध्यमातून पाझर तलावाची दुरुस्ती तसेच गावातील विकास कामे केली जाणार असल्याचे वेल्हाळेचे महायुतीचे युवानेते किशोर भांड यांनी सांगितले.

नायक ANCHOR

# पाण्यापासून वंचित शेतकऱ्यांना न्याय देता आला : देसाई

**नायक वृत्तसेवा, आश्वी**

आम्ही घडवलेले विद्यार्थी आज समाजात अनेक पदावर काम करतात, हे ऐकून व पाहून मन प्रसन्न झाले. सेवानिवृत्ती नंतरच्या काळामध्ये भूगर्भातील पाणी शोधण्याच्या छंदाला पुढे घेऊन जात असताना 'पानाड्या' म्हणून हजारो शेतकऱ्यांना भूगर्भातील पाणी शोधून दिले. त्यामुळे अनेक वर्षापासुन पाण्यासाठी वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय देता आला. त्यामुळे मला देसाई सर ऐवजी 'पाणाडी देसाई सर' म्हणून ओळख मिळाली, त्यामागे आश्वी बुद्रुक गावचा मोठा हातभार असल्याचे गौरवोद्गार सेवानिवृत्त शिक्षक नारायण देसाई यांनी काढले.

संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथील रयत शिक्षण संस्थेच्या आश्वी इंग्लिश स्कुलच्या सन १९८८ ला इयत्ता १० वी ला असणाऱ्या विद्यार्थ्यांचे ३७ वर्षानंतर स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी सेवानिवृत्त शिक्षक नारायण देसाई, सेवानिवृत्त प्राचार्य सोमनाथ दिघे,बी.एम. ठुबे,जगन्नाथ



गमे, नेहे,प्राचार्य देवराम वडीतके, राजेंद्र शहाणे तसेच शिक्षक, इतर कर्मचारी किसन उदावंत उपस्थित होते. यावेळी सन १९८८ च्या १० वीच्या वर्गात विद्यार्थी असलेल्या कै. तुकाराम ताजणे,कै. प्रशांत दाईगडे,कै. लक्ष्मण आंधळे,कै. रंजना आंधळे,कै. सुनिल खेमनर यांचे निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य सोमनाथ दिघे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांची हजेरी घेतली.

पुढे बोलतांना नारायण देसाई म्हणाले, दिवसेंन दिवस सामजातील एकोपा कमी होत चालला आहे.या गावाने माझ्यावर जिवापाड प्रेम केले. त्यामुळे आज ही मला आश्वी गाव सोडण्याचा प्रसंग आठवला ही मन भरून येते. सन १९८१ ते १९९५ पर्य़ंत येथील शाळेत विद्यार्थी घडवण्याची संधी मला मिळाली यांचा आज आनंद होतो. पत्रकार सिताराम चांडे म्हणाले की,लहान पणापासुनच राजकारण व समाजकारणाची आवड होती, विविध विषयावर लेख लिहिण्याची माझी आवड पाहून लोणीच्या पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयातील प्रा. शंकरराव दिघे यांनी मला ११ वीला प्रवेश घेतल्यानंतर पत्रकारिता करण्याबाबत मार्गदर्शन केले. बी.एस. सी. शिक्षण पुर्ण झाल्यानंतर नोकरी करण्या ऐवजी मग पत्रकारीता सुरू केली. आज जवळ पास २५ वर्षाहून अधिक काळ मी पत्रकारीता क्षेत्रा मध्ये काम करत आहे. यावेळी पोलिस उपनिरीक्षक सुकदेव खेमनर, इंजिनिअर अनिल हिंगे,अशोक बोर्डे,भागवत खेमनर,दिपक घोलप,राजेंद्र मंडलिक,जगदीश तापडीया,संतोष रासने,भरत सांगळे,नंदु लाहोटी,राजेंद्र डेगंळे,अरुण कदम,संजय उपस्थित होते.

# समाजमन सुन्न करणारी लालाय्यू कांदबरी :डॉ.तांबे



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

विना अनुदानित शिक्षकांच्या व्यथा,वेदना समाजाच्या मनपटलावर मांडत समाज, वाचकांचे मन सुन्न करणारी कादंबरी म्हणजे लालाय्यू असे प्रतिपादन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.

येथील भाऊसाहेब गुंजाळ पाटील, सह्याद्री ज्युनिअर कॉलेजच्या के.बी.दादा देशमुख सभागृहात नुकतेच लालाय्लू या कादंबरीचे डॉ.सुधीर तांबे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.यावेळी माजी नगराध्यक्षा दुर्गा तांबे, आर.बी. राहणे, विजय राहणे, शांताराम कढणे, ज्येष्ठ लेखक प्रा.मा. रा.लामखडे,प्रधान जिल्हा न्यायाधीश तथा संस्थेचे सचिव सुमंत कोल्हे, सहसचिव तथा विशिष्ट आचार्य बाबुराव गवांदे,ज्येष्ठ लेखक प्रा.विठ्ठल शेवाळे,संगमनेर महाविद्यालयाचे माजी इंगजी विभाग प्रमुख प्रा.डॉ. रोहित कावळे,पुरोगामी लेखक प्रा.डॉ.राहुल हांडे,संस्थेचे विश्वस्त मधुकर सोनवणे यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. तांबे म्हणाले की, प्रा.संतोष भालेराव लिखित लालाय्लू या कादंबरीतून विनाअनुदानित शिक्षकांच्या व्यथा,शिक्षकांच्या समस्या वेदना,स्वप्ने,इच्छा-आकांक्षा समाजाच्या मन पटलावर मांडल्या आहेत. या कांदबरीतुन शिक्षकांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष वेधले आहे.लालाय्लु शिक्षण व्यवस्थेतील शेंड्या लावणारी प्रवृत्ती वाढत आहे, त्याचे दर्शन या कादंबरीतून संतोष भालेराव यांनी घडवून आणले आहे. कादंबरी प्रकाशन सोहळ्याचे आयोजन प्राचार्य प्रा.डॉ.बी. डी.वाघ,उपप्राचार्य प्रा.डॉ. व्ही.एस.कोल्हे, सह्याद्री ज्युनिअर कॉलेज प्राचार्य प्रा.के. जी.खेमनर,सह्याद्री ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा.एस. पी.सुरसे,शिक्षक प्रतिनिधी प्रा.जी.एल.गुंजाळ,शिक्षिका प्रतिनिधी प्रा.क्यु. एच.सय्यद,शिक्षकेत्तर प्रतिनिधी एस.डी.आव्हाड,प्रा.नवनाथ डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. सूत्रसंचालन प्रा.जी.एल.गुंजाळ यांनी केले. तर प्रास्ताविक प्रा.नवनाथ गुंड यांनी आणि आभार प्रा.एस. पी.सुरसे यांनी मानले.


पाहिजेत 9850545333

एम. जी. काजळे ज्वेलर्ससाठी
तात्काळ पाहिजेत

सेल्समन - 4 जागा (स्त्री/पुरुष)
कॉम्प्युअर ऑपरेटर - 2 जागा

पगार - 15000 ते 20000व इतर सवलती

पत्ता- एम. जी. काजळे ज्वेलर्स, जाणता राजा रोड, संगमनेर






MALPANI

प्रोसेस विभागात
कामगार भरती
चालू आहे!

वयोगट १८ ते ३५ वर्षापर्यंत, शिक्षणाची अट नाही,
पुरुष कामगारांसाठी होस्टेलची सुविधा, कंपनी युनिफॉर्म,
नियमानुसार पी.एफ., बोनस, ई.एस.आय.सी. (शासकीय वैद्यकीय विमा)
पाल्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना, सवलतीच्या दरात कॅन्टीन व
ग्राहक भांडारची सोय, या सारख्या अनेक सोई-सुविधा व सवलती
सर्व लाभांसह एकत्रीत दर (८ तासांसाठी) दैनिक वेतन रु. ५४०/-

अधिक माहितीसाठी संपर्क
मे. दामोदर जगन्नाथ मालपाणी
मालपाणी इस्टेट, अकोले रोड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर
मो. ८९५६९५६६१२
मो. ९८२२६०१६५२
मो. ९५५२८८१३००


'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टॅंडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

**पाहिजेत**

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४

बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन
सर्जरी
लेझर सेंटर
स्त्रीरोग-प्रसुति
मुळव्याध-भगंदर-फिशर



शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.

१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155

# शिवसेनेत प्रत्येकाचा मानसन्मान : आ.खताळ



- गेल्या चाळीस वर्षात डोळे गावचा विकास झाला नाही. त्यामुळे माझ्या गावचा विकास करण्यासाठी तसेच हिंदुत्वाची भावना जागृत करण्यासाठी, गावच्या विकासासाठी आपण आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला असल्याचे झोळेचे उपसरपंच गोविंद खर्डे त्यांनी सांगितले.

- आम्ही सर्व शिवसेनेचे पदाधिकारी अनेक दिवसापासून उद्धव बाळासाहेब ठाकरे या गटाचे काम करत होतो परंतु आम्हाला कधी मानसन्मान दिला नाही. तसेच या गटाचे विद्यमान खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना आम्ही निवडून आणले. परंतु ते आता आम्हाला विचारत नाहीत आणि आमचा फोनही उचलत नाही असा गंभीर आरोप करत जर आपल्याला या पक्षात कोणी विचारत नसेल तर त्या पक्षात राहून उपयोग तरी काय असे मत शिवसेनेचे उप तालुकाप्रमुख निलेश गुंजाळ, संगमनेर खुर्द गटप्रमुख संकेत खुळे यांनी व्यक्त केले.

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

मी जरी आमदार असलो तरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा एक कार्यकर्ता म्हणूनच काम करत आहे. शिवसेनेत सर्व जण स्वतःला कार्यकर्ता समजून काम करत असतात. त्यामुळे शिवसेनेमध्ये प्रवेश केलेल्या सर्व शिवसैनिकांचा मानसन्मान केला जाईल असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

संगमनेर खुर्द गटातील (उबाठा) गटाचे उपतालुकाप्रमुख निलेश गुंजाळ, गण प्रमुख संकेत खुळे, सचिन पावबाके, पांडुरंग कानवडे यांच्यासह झोळे गावचे विद्यमान उपसरपंच मेजर गोविंद खर्डे यांच्यासह पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी उबाठा गटाला जय महाराष्ट्र करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश केला. या वेळी व्यासपीठावर शिव-सेनेचे तालुका प्रमुख रामभाऊ राहाणे, रमेश काळे, शहर प्रमुख दिनेश फटांगरे, गण प्रमुख श्याम राहणे, उपशहर प्रमुख अजित जाधव यांच्यासह संगमनेर खुर्द,रायतेवाडी, निमगाव पागा येथील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ.खताळ म्हणाले की संगमनेर खुर्द गटातील अनेक शिवसैनिकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. ती आज पूर्ण झाली आहे.मी जरी या तालुक्याचा आमदार असलो तरी एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून काम करत आहे. उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे हे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत आहेत.आज संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्या नेतृत्वाखाली शिव-सेनेची ताकद वाढत आहे. सर्वसामान्यांची कामे त्यांच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना वाढत आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. संगमनेरमध्ये सर्वसामान्यासाठी लवकरच आपले संपर्क कार्यालय सुरू होत आहे. त्या कार्यालयाच्या उद्घाटनासाठी स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणार आहेत. तेव्हा असंख्य तरुण शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. नवीन आलेल्यांना कधीच नवीन जुने असे जाणवणार नाही. सर्व शिवसैनिकांनी हे नेते म्हणून नव्हे तर कार्यकर्ते आहे असे मानून काम करा. शिवसेना हा आपला परिवार आहे. समाजातील सर्व घटकातील लोकांची कामे झाली पाहिजेत यासाठी प्रयत्नशील रहा. गटबाजी कुठल्याही परिस्थितीत खपवून घेणार नाही अशी तंबी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना देत आमदार खताळ म्हणाले की, संगमनेर खुर्द गटातील आणि गणातील काही विकासाचे प्रश्न बाकी असतील ते सर्व सोडवण्यासाठी कटिबद्ध राहील लवकरच उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आभाराचा मेळावा घ्यायचा आहे. त्या वेळी सुद्धा मोठ्या संख्येने तरुण शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. आगामी काळात तालुक्यात शिवसेनेची ताकद वाढवून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकीमध्ये आपल्याला भगवा फडकवायचा आहे. त्या दृष्टीने सर्वांनी आत्तापासूनच कामाला लागावे असा ही सल्ला आमदार खताळ यांनी शिवसैनिकांना दिला.

# गोव्यात झालेल्या स्विमिंग स्पर्धेत अमृता जोंधळे हिचे यश

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

तालुक्यातील कौठे कमळेश्वर येथील अमृता उत्तम जोंधळे या केवळ आठ वर्षे वयाच्या चिमुकलीने गोव्यातील आरबी समुद्रात झालेल्या एक किलोमीटर स्विमिंग स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावला.

गोव्यामध्ये झालेल्या या आंतरराष्ट्रीय स्विमिंग स्पर्धेत सुमारे २५ राज्यांनी सहभाग घेतला होता. त्यात तालुक्यातील कौठे कमळेश्वर गावातील अमृता उत्तम जोंधळे हिने दहा वर्षे वयोगटांमधील एक किलोमीटर स्विमिंग स्पर्धेत सदर अंतर सत्तावीस मिनिटात पूर्ण करत चौथा क्रमांक पटकावला आहे. याबद्दल तिला तेथे मेडल आणि सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले आहे. अमृता जोंधळे हिने मिळवलेल्या या यशाबद्दल कौठे कमळेश्वर सह



पंचक्रोशीतील सर्व गावातून तिचे कौतुक होत आहे. अमृताने संगमनेर तालुक्याचे व कौठे कमळेश्वर गावाचे नाव देश पातळीवर गाजवले असल्याने तिचे सर्वच क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

अमृता जोंधळे हिच्या या यशाबद्दल लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, दुर्गा तांबे, कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीथोरात, इंद्रजीत थोरात, बचत गटाच्या सुनीता कांदळकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# उपसरपंचाने केली स्मशानभुमीची स्वच्छता!

## ग्रामविकास अधिकारी, सदस्यही स्वच्छतेसाठी सरसावले

**नायक वृत्तसेवा, आश्वी**

अनेकदा ग्रामपंचायतीचा पगार घेऊनही गावाची स्वच्छता न करणारे कर्मचारी आपण एकीकडे पाहतो, मात्र संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथे चक्क उपसरपंचाने स्वतः पुढे होत हाती झाडू घेऊन स्मशानभूमीची स्वच्छता केली. ते पाहून ग्रामपंचायतीचे सदस्य, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी ही हाती झाडू घेत परिसर स्वच्छ केला.

आश्वी खुर्द गावची स्मशानभुमी प्रवरा नदीपात्रा लगत आहे. गावात अनेकदा दुःखद घटना घडत असतात. त्या पार्श्वभूमीवर अंत्यविधीच्या ठिकाणी गावातील ग्रामस्थांसह दुसऱ्या गावातील पाहुणे, रावळे उपस्थित राहत असतात. अशावेळी स्मशानभूमीची स्वच्छता राखणे गरजेचे असते. त्यातच स्वच्छता कर्मचाऱ्यांची कमतरता तसेच इतर मजुर ही पैसे देऊन स्वच्छता करत नसल्याने ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला होता.



दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या घराला द्या आधुनिक सौंदर्याची अद्भुत झलक
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

नायक ANCHOR

# कौशल्य भवन संस्थेच्या इतिहासातील सोनेरी पान : मालपाणी



- कृष्णकुमार बूब यांनी बूब कुटुंबीयांचे संगमनेरच्या मातीशी असलेले अतूट नाते सांगितले. आम्हाला ज्या अडचणी आल्या, त्या इतरांना येऊ नयेत, यासाठीच हा छोटासा प्रयत्न आहे. आज आपल्या देशाला कौशल्य विकासाची नितांत गरज आहे आणि अशा कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमांमुळे देशाच्या विकासाला नवी गती मिळेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**


कौशल्य विकास भवनातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान मिळणार नाही, तर त्यांच्या कौशल्यांचा विकास साधला जाईल. त्यामुळे कौशल्य भवन संस्थेच्या इतिहासातील सोनेरी पान असल्याचे गौरवोद्गार शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी काढले.

शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर महाविद्यालयाने कौशल्य भवनाच्या निमित्ताने आपल्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. संस्थेत नव्याने साकारलेल्या 'श्री रामनारायण श्रीकिसन बूब कौशल्य भवना' च्या इमारतीचे नुकतेच उद्घाटन संपन्न झाले. या आधुनिक कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचे आणि रोजगाराचे नवे दालन खुले झाले आहे.

क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि. पुणेचे व्यवस्थापकीय संचालक अशोक बूब यांच्या हस्ते आणि क्लीन फिनोकेम लि., पुणेचे कार्यकारी संचालक कृष्णकुमार बूब यांच्या प्रमुख उपस्थितीत या कौशल्य विकास भवनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे, शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.संजय मालपाणी, शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश क्षत्रिय, खजिनदार राजकुमार गांधी, सचिव डॉ. अनिल राठी, जनरल सेक्रेटरी सीए. नारायण कलंत्री, बांधकाम समितीचे अध्यक्ष संतोष करवा, जसपाल सीताराम डंग आणि प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित होते.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी शिक्षण प्रसारक संस्थेच्या समर्पित कार्याचे अभिनंदन केले. संगमनेर महाविद्यालयाचा विकास मी अगदी जवळून पाहिला आहे. या संस्थेने नेहमीच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न केले आहेत आणि ही नवीन वास्तू त्या प्रयत्नांचेच प्रतीक आहे. येथे शिक्षण घेणारी तरुण पिढी निश्चितच आत्मनिर्भर बनेल,असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

सीए. नारायण कलंत्री यांनी नूतन वास्तूची माहिती देतांना सांगितले की, ही चार मजली इमारत आधुनिक सोयी-सुविधांनी सज्ज आहे. तळमजल्यावर परीक्षा विभाग, पहिल्या मजल्यावर प्राणिशास्त्र विभाग, दुसऱ्या मजल्यावर बी.व्होक आणि हॉस्पिटलिटी मॅनेजमेंट विभाग, तिसऱ्या मजल्यावर सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट प्रोग्रामिंग आणि चौथ्या मजल्यावर एमबीएच्या अद्ययावत वर्गांची सोय आहे. प्रत्येक मजला दहा हजार चौरस फुटांचा असून, यात आधुनिक फर्निचरसह प्रशासकीय कार्यालयाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या भव्य इमारतीसाठी दात्यांनी उदार हस्ते मदत केली आहे, त्या सर्व दान दात्यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.संतोष करवा यांनी पाहुण्यांचा परिचय करून त्यांचा सत्कार केला. सूत्रसंचालन सचिन पल्लोड व डॉ. जितेंद्र पाटील यांनी तर डॉ.अनिल राठी यांनी आभार मानले. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी शिक्षण प्रसारक संस्थेचे सर्व सदस्य, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री कळसेश्वर महाराज श्री गणेशाय नमः श्री संत सेना महाराज
#1 CUT'S Hair & Beauty Studio
ONE CUT WIG CENTRE
काही मिनिटातच तारूण्य अवस्थेतील केस परत मिळवा..
टक्कल पडलेय नो टेन्शन त्यावर आहे आता नवीन ऑप्शन


ऑपरेशन विना तारूण्यावस्थेतील केस परत मिळवा
₹ 10,000 ₹ 6,999/-
पत्ता - अभंग पेट्रोल पंपासमोर, पेटीट हायस्कुल अकोले रोड, संगमनेर
मो. 9511233837 / 9142255255



AMFI Certified म्युच्युअल फंड वितरक
KADLAG INVESTMENT
...Dreams make sense...
HELP LINE : 91503 06306 | 91425 59000
एस.- 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर

आपल्या लाडक्या मुलीच्या कन्यादाना साठी ८५०००/- रुपयांपासून पुढे भांडी व फर्निचर खरेदी करा
२५०००/- रुपयांचे हनिमून पॅकेजचे मानकरी व्हा ..!
अगदी कमी ग्राहकांच्या संख्ये मधून मानकरी होता येईल..!
* नियम व अटी लागू
ऑफर कालावधी : २० एप्रिल ते ३० जून पर्यंत लागू.
प्रत्येक बस्त्यावर Traveler Bag हमखास मोफत मिळवा.
शुभ विवाह महोत्सव

जिव्हाळा आंतरिक... वस्तू अत्याधुनिक ..!
गृह वस्तू भांडार ®
• फर्निचर • भांडी • इलेक्ट्रॉनिक्स
शाखा नं. 1 व 2 (IFB Point): बाजारपेठ, संगमनेर । मो. 7719047007
शाखा नं.3 समनापूर गणपती मंदिराजवळ संगमनेर । मो. 9175569966

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय् KH
कुटे हॉस्पिटल अँण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५